**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे मार्च २००७ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी अल्पबचत सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२५ / सांगली |
| २ | अपीलकर्ता | श्री. शौकत इकबाल मुल्ला<br>मु.पो. कारंदवाडी, ता. वाळवा, जि. सांगली |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपविभागीय अधिकारी, वाळवा विभाग इस्लामपूर<br>जि. सांगली |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी, सांगली,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली |

वरील तीनही घटक गैरहजर होते. अपीलकर्त्यास माहिती दिलेली असल्याने, अपीलकर्त्याने आपले अपील निकाली काढण्याबाबत उपविभागीय अधिकारी, वाळवा विभाग, इस्लामपूर जि. सांगली यांना कळविले आहे. उपविभागीय अधिकारी, वाळवा विभाग, इस्लामपूर जि. सांगली यांनी त्यांच्या दि. १३.५.२००८ रोजीच्या पत्रान्वये ही बाब आयोगास कळविली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २२.५.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२६ / सांगली |
| २ | अपीलकर्ता | श्रीमती छाया नामदेव कांबळे<br>रा. सि.स.नं.१२५३-अ, गावभाग, हरिपूर रोड,<br>सिध्दार्थनगर, सांगली |
| ३ | जन माहिती अधिकारी | १. प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली<br>२. विशेष भूसंपादन अधिकारी क्र.१, जि. सांगली |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हाधिकारी सांगली |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता, उभय बाजूंचे माहितीबाबत एकमत झाले. अपीलकर्त्यास देय असणारी गट विमा व भविष्य निर्वाह निधीची रक्कम अदा करण्याचा विषय प्रशासकीय कार्यवाहीचा असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र देय रक्कम एक महिन्यात देण्यात येईल, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी सांगितल्यामुळे अपील निकाली काढण्यास अपीलकर्त्याने संमती दिली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २४.५.२००८**

(शिक्का: राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे विभाग यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. कृष्णा विश्वनाथ जंगम
मु.पो.ता. वाळवा, जि. सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार वाळवा
तहसील कार्यालय, वाळवा-इस्लामपूर,
जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
निवासी नायब तहसीलदार, वाळवा-
इस्लामपूर, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२७ / सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २१.११.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | ३.१.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याो ार्णय दिल्याची तारीख | २९.१.२००७ |
| ६ | **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>वाळवा तालुक्यातील रेशन दुकानाच्या अनुषंगाने एकूण ८ मुद्दयांची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. कृष्णा विष्णू जंगम यांना वाळवा तालुक्यातील रेशन दुकानाच्या अनुषंगाने एकूण ८ मुद्दयांची माहिती मागितली होती. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने श्री. जंगम यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दरम्यानच्या काळात सदर अपिलांच्या अनुषंगाने आवश्यक असणारी माहिती मिळाली असल्याने सदर अपील निकाली काढण्याबाबत दि. ३१.३.२००९ रोजीच्या पत्राने श्री. जंगम यांनी आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २३५.२००८**

ddddd

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१५.०५.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२७/सातारा |
| २ | अपील कर्ता | श्री. महमंद बाबालाल मुल्ला,<br>३८,लक्ष्मीनगर, एम.आय.डी.सी.सातारा,<br>जि.सातारा |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप विभागीय अधिकारी कराड, जि.सातारा |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी सातारा, जि.सातारा |

अपीलकर्त्यास जात प्रमाणपत्राबाबतची माहिती मिळाली असल्याचे वरील तीनही घटकांनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३१.०५.२००८

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१५.०५.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२८/सातारा |
| २ | अपील कर्ता | श्री. दिपक बाळासाहेब रा.नवीन मार्केट यार्ड शेजारी यशवंतनगर, वाई , जि.सातारा |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपविभागीय अधिकारी,वाई उपविभाग वाई |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अपर जिल्हाधिकारी, सातारा, जि.सातारा |

अपीलकर्त्यास माहिती मिळाली असल्याचे, तसेच चुकीच्या पध्दतीने वर्गीकरण करणे, कागदपत्रे नष्ट करणे याबद्दल संबंधित कर्मचा-यावर कारवाई करण्याच्या अपीलकर्त्याच्या मागणीनुसार कारवाईही करण्यात आली असल्याचे तीनही घटकांनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.31 .०५.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

55

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.चंद्रकांत सदाशिव जाधव
४२९, डी, गंगावेश, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर, विभागीय कार्यालय, शिवाजी मार्केट, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३ / कोल्हापूर /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.१०.२००६ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.चंद्रकांत सदाशिव जाधव
४२९, डी, गंगावेश, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर
श्री.कुणालकुमार

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर, विभागीय कार्यालय, शिवाजी मार्केट, कोल्हापूर
तर्फे श्री.नेत्रदिप शंकरराव सरनोबत, शहर अभियंता

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.४.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री दत्तमहाराज देवस्थान ट्रस्टने केलेल्या बांधकाम/शेडच्या नियमबाह्य, विनापरवाना अनधिकृत बांधकामाच्या संदर्भातील लोकशाही दिनातील ८३८/१२.१२.२००५ च्या अर्जाच्या अनुषंगाने आयुक्तांनी काढलेल्या दि.८.१२.३००५ च्याआदेशाची प्रत मिळावी. |

## विवेचन

श्री दत्तमहाराज देवस्थान ट्रस्टने केलेल्या अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात लोकशाही दिनात केलेल्या अर्जावर कोल्हापूर महानगरपालिका आयुक्तांनी काढलेल्या आदेशाची प्रत, तसेच दि.१.१२.२००५ व १४.१२.२००५ च्या नोटिशीवर सही असलेल्या अधिकाऱ्यांची नांवे अशी माहिती अपीलकर्ता श्री.चंद्रकांत सदाशिव जाधव यांनी जन माहिती अधिकारी तथा उपशहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, विभागीय कार्यालय यांच्याकडे मागितली होती. माहितीचे दोन कागद असून प्रत्येक पृष्ठाला पंधरा रुपये याप्रमाणे ३० रुपये आकारणी जन माहिती अधिकारी यांनी केली. त्याविरुध्द श्री.जाधव यांनी अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार प्रतीपृष्ठ रुपये २/- प्रमाणे शुल्क आकारणी करावी व ऊर्वरित रक्कम श्री.जाधव यांना परत करावी, असे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिले. त्यानुसार रक्कम परत मिळाली नाही, तसेच नोटिशीवर सही असलेल्या अधिकाऱ्यांची नावेही जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविली नाहीत, म्हणून श्री.जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अपीलकर्त्याने माहितीच्या अधिकारात अर्ज केल्यास दखल घेऊ नये, असा आदेश आयुक्तांकडून घेऊन जन माहिती अधिकारी तथा उपशहर अभियंता श्री.मोहन कृष्णा कुंदेकर यांनी अपीलकर्त्याला तसे कळविले, असे श्री.जाधव यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. मात्र हे निवेदन दिशाभूल करणारे असल्याचे जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता श्री.नेत्रदिप शंकरराव सरनोबत यांनी नमूद केले. 'संबंधित विषयात न्यायालयाकडे दावे सुरु असून

महानगरपालिकेने कोणतीही कारवाई करु नये म्हणून आदेश झालेला आहे. त्यामुळे न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत कोणतीही कार्यवाही करता येत नाही. म्हणून तुम्ही सदरकामी माहितीचा अधिकार, लोकशाही दिन, मा.आयुक्त कार्यालयात कोणत्याही स्वरुपाचा तक्रारअर्ज करु नये. तसेच तुम्हांस माहितीच्या अधिकाराखाली जरुर ती कागदपत्रे देण्यात आली आहेत'. असे पत्र श्री.सर्जेराव व श्री.चंद्रकांत सदाशिव जाधव यांना श्री.कुंदेकर यांनी पाठविल्याचे श्री.सरनोबत, शहर अभियंता यांनी सदर पत्राच्या प्रतीसह निवेदन केले.

जादा आकारलेले शुल्क रुपये २८/- आपल्याला परत करावे, असे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना दि.२.१२.२००६ रोजी दिले, मात्र प्रत्यक्षात या अतिरिक्त रकमेचा धनादेश काढल्याचे आपल्याला आयोगापुढील सुनावणीच्या सूचना प्राप्त झाल्यानंतर- दि.२१.१०.२००७ रोजी, म्हणजे जवळजवळ दीड वर्षाने जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. नोटिशीवरील सह्या असलेल्या अधिकाऱ्यांची नावे दि.१५.४.२००६ रोजी कळविली. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.कुंदेकर यांनी माहितीच्या अधिकाराची पायमल्ली केल्याचे स्पष्ट होते, असे प्रतिपादन श्री.जाधव यांनी केले.

वरील वस्तुस्थिती व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने यांचा विचार करता पुढील बाबी स्पष्ट होतात :

(१) संबंधित दाव्यात महानगरपालिकेने अन्य कार्यवाही करण्यास न्यायालयाची मनाई असली तरी माहितीच्या अधिकारात माहिती देण्यास न्यायालयाने प्रतिबंध केला नसल्यास अशी माहिती देणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये बंधनकारक आहे. या स्थितीत अपीलकर्त्यास माहिती मागू नये, असे कळविणे कायद्याशी सुसंगत नाही.

(२) अतिरिक्त शुल्क परत करण्यास दीड वर्ष एवढा कालावधी घेणे कारवाईला पात्र आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार माहिती देण्याबाबत प्रतिबंध करणारा आदेश व अनुषंगिक पत्र अयोग्य असून त्याबाबत अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

(३) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.मोहन कल्लाप्पा कुंदेकर यांनी माहिती व अतिरिक्त शुल्क परत करणे याबाबत तत्परतेने कार्यवाही केलेली नाही. त्यांच्या या कृतीमुळे आपल्याला झालेल्या त्रासापोटी रु.५००/- नुकसानभरपाई मिळावी, ही अपीलकर्त्याची मागणी मंजूर करण्यात येत आहे. त्यानुसार श्री.मोहन कल्लाप्पा कुंदेकर, उपशहर अभियंता यांनी अपीलकर्ता श्री.चंद्रकांत सदाशिव जाधव यांना रु.५००/- व्यक्तिशः द्यावेत. दि.१५.५.२००८ पर्यंत याची पूर्तता करुन आयोगाला अहवाल सादर करावा. या कार्यवाहीची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांची राहील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.५.५.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३० / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. पंडीतराव दाजी कुलकर्णी<br>रा. ब्लॉक नं. १, इंचलकरंजी तर्फे कुलमुख्यत्यार<br>श्री. सुरेश केशव सोमण<br>रा. व्यंकटेश अपार्टमेंट, इचलकरंजी |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याधिकारी नगरपरिषद, इचलकरंजी जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे विभाग, पुणे |

सन १९८१ ते २००६ पर्यंतची भाडे तपासणी विषयक माहिती अपीलकर्त्यांने मागितली होती. सन १९८१-८२ चा भाडेतक्ता अद्याप नगरपालिकेकडून मिळाला नसल्याचे अपीलकर्त्याने नमूद केले आहे. सदरची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अपीलकर्त्यास उपलब्ध करून द्यावी, असे वरील तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेत ठरले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास सन १९८१-८२ चा भाडेतक्ता उपलब्ध करून द्यावा व पूर्तता अहवाल आयोगास आठ दिवसांत सादर करावा.

**पुणे**
**दि. २६.५.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३२ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. प्रशांत प्रकाशराव साळुंखे<br>१२५७, ए वॉर्ड, संध्यामठ गल्ली, शिवाजी पेठ,<br>कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक, भूमि अभिलेख, कोल्हापूर |

मोजणीच्या अनुषंगाने क्षेत्र दुरूस्तीची व नकाशाची मागणी आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत हा कार्यवाहीचा विषय येत नाही. परंतु तीनही घटकांमधील चर्चेत अपीलकर्त्याचे समाधान झाल्याने अपील निकाली काढण्याचे ठरले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २६ .५.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

92/14 134

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.सूर्यकांत बंडू सुणगार
१६/१३६८, डॉ.ढवळे हॉस्पिटलमागे, शिवाजीनगर,
इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहकार आयुक्त व निबंधक ,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | १३४/कोल्हापूर / २००६ |
| २.सुनावणीची तारीख | १३.५.२००८ |

**३.उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सूर्यकांत बंडू सुणगार
१६/१३६८, डॉ.ढवळे हॉस्पिटलमागे, शिवाजीनगर,
इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकार आयुक्त व निबंधक ,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे करिता श्री.प्रकाश अष्टेकर

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, संहकारी संस्था,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.एस.एस.कुंभार

| | |
|---|---|
| ४.जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | दि.१४.२.२००६ |
| ५.जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | दि.२७.२.२००६ |
| ६.अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | दि. |
| ७.अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | -- |

८. **मूळ मागणीचा तपशील**

१.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणी झलेल्या सहकारी संस्थाकरिता सहकारी संस्थांचे निबंधक हे सक्षम प्राधिकारी आहेत. सदर नियमाअन्वये उपनिबंधक हे जिल्ह्याचे नागरी बँकेचे सक्षम प्राधिकारी होतात. जर नागरी बँकेतील माहिती हवी असलेस अर्जासंबंधी बँकेकडे किंवा उपनिबंधकाकडे करावा याबाबत माहिती मिळावी. तसेच नागरी बँकांना माहिती अधिकारी नियुक्त करणेस आदेश दिलेला असलेस प्रत.
२.सध्या अस्तित्वात असलेले शासनाचे धोरणाचे, रिझर्व बँकेचे उपनिबंधक कार्यालयात समस्त व अनुसूचीत जमातीच्या जागेवर नागरी बँकेत बढतील. पदोन्नतीबाबत बदलीबाबात शासन परिपत्रकाची व रिझर्व बँकेची उपनिबंधक कार्यालयास प्राप्त झालेली प्रत व नागरी बँकांना उपनिबंधकांनी पाठविलेली प्रत.(सन १९६५ पासून)

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी हजर होते.

नागरी सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ निर्णय लागू नाही हे सरकारचे प्रतिपादन राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी पूर्वी अन्य निर्णयात मान्य केले आहे. तसेच नागरी सहकारी बँकांना हा कायदा लागू असल्याच्या काही निर्णयाविरुध्द उच्च न्यायालयात अर्ज दाखल झालेले आहेत. हे लक्षात घेता राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या निर्णयाप्रमाणे स्थिती आयोग तूर्त कायम ठेवत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

नागरी सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू नसल्याचे प्रतिपादन तूर्त मान्य करण्यात येत असून अपील निकाली काढण्यात येत आहे.

**कोल्हापूर**
**दि.१६.५.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**मे-२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१५.०५.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६/सातारा |
| २ | अपील कर्ता | श्री. उत्तमराव तुकाराम माने<br>क्रांतिस्मृती,कनिष्ठ अध्यापक महाविद्यालय,<br>११२, शुक्रवार पेठ, जि.सातारा-४१५ ००२ |
| ३ | जन माहिती अधिकारी | शिक्षण उपसंचालक,<br>शिक्षण उपसंचालक कार्यालय,<br>कोल्हापूर विभाग, जिल्हा कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षण उपसंचालक,<br>शिक्षण उपसंचालक कार्यालय,<br>कोल्हापूर विभाग, जिल्हा कोल्हापूर |

अपीलकर्त्याने मागितलेली माहिती वेतननिश्चिती व तद्नुषंगिक आर्थिक लाभाच्या संबंधातील असून त्यानुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची आहे. सदरचा विषय हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेमध्ये येत नाही. तथापि, याबाबत वरील तीनही घटकात झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्यास माहिती मिळाल्याने अपील निकाली काढणेबाबत अपीलकर्त्याने अनुमती दिली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३१.०५.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**